Indian Streams Research Journal
Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011
ISSN:- 2230-7850 Available online at www.isrj.org

# भंडारा जिल्हयातील तुमसरचा 1942 चा स्वतंत्र्य लढा

प्रा. राजु भा. खरडे

राजेंद्रसिंह उर्फ बाबा व्यास कला वाणिज्य महाविद्यालय ,कोंढाळी जि. नागपूर.

**प्रस्तावना–**

भंडारा जिल्हा महाराष्ट्राच्या अतिपुर्वेकडे असून, त्या भागाला झाडीपट्टी म्हणत. भंडाऱ्याची पितळची भांडी भारतभर प्रसिध्द होती आणि आजही आहे. पितळी भांडयाबरोबर तांदुळासाठीही भंडारा जिल्हा प्रसिध्द आहे. भंडारा जिल्हयावर मौर्य, सातवाहन, वाकाटक, कलचुरी, राष्ट्रकुट, गोंड, भोसले या घराण्याची सत्ता होती. 2 नोव्हेंबर 1861 मध्ये भंडारा जिल्हा मध्यप्रांतात समाविष्ट करण्यात आला. भंडारा नागपूरजवळ असल्यामुळे नागपूरच्या राष्ट्रीय आंदोलनाचे पडसाद भंडारा येथे उमटून, राष्ट्रीय जागृतीचे कार्य सुरू झाले. 1906 पासून कॉग्रेसच्या अधिवेशनात व राष्ट्रीय चळवळीत भंडारा जिल्हयातील लोक सहभागी होवू लागले. 1918 मध्ये भंडारा म्युनिसीपालटीचे अध्यक्ष विष्णुपंत जकातदार व बॅ. अभ्यंकरांच्या प्रयत्नामुळे लो. टिळकांनी भंडारा येथे भेट दिली. खामतलावाजवळील पटांगणावर हजारो लोकांसामोरभाषण करतांना टिळक म्हणाले ‘आम्हाला परकियांचे राज्य नको, ते कितीही चांगले असले तरी, ज्यांची बुध्दी हिंदुस्तानला हमाल करण्याची आहे, त्यांचे शासन आम्ही सहन करणार नाही, भाषणाच्या शेवटी ‘स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे, आणि तो मी मिळविणारच’ अशी गर्जना दिली.’ या भाषणाच्या परिणामाने स्वातंत्र्याची ज्योत भंडारा जिल्हयात अधिकच प्रज्वलित झाली. लोकमान्य टिळकांचे गोंदियालाही भाषण झाले. अशा प्रकारे टिळकांच्या भेटीमुळे भंडारा जिल्हयात स्वातंत्र्य चळवळीसाठी अत्यंत अनुकूल वातावरण तयारझाले. 1 ऑगस्ट 1920 रोजी टिळकांचा मृत्यु झाला. आणि गांधी युगाला सुरूवात झाली. महात्मा गांधीजींच्या सर्व चळवळीमध्ये भंडाराजिल्हयातील लोकांनी मोठया संख्येने भाग घेतला. गांधीजींच्या दौऱ्यांनी भंडारा जिल्हयात अनुकूल वातावरण तयार होवून 1942 च्या चळवळीत मोठया संखेने लोक सहभागी झाले.

9 ऑगस्ट 1942 ला मुंबईला महात्मा गांधीजीसह प्रमुख कॉग्रेस पुढाऱ्यांना अटक होताच, संपुर्ण भारतात चलेजाव चळवळीची सुरूवात झाली. भंडारा जिल्हयातही 1942 च्या चलेजाव चळवळीचा प्रारंभ होवून, लवकरच स्वातंत्र्य लढयाने तिव्र स्वरूप धारण केले.

**तुमसरमधील गोळीबार :–**

भंडारा जिल्हयात चलेजाव चळवळ तिव्र होवु नये व लोकांवर अंकुश बसावा, म्हणुन पोलीसांनी 10 ऑगस्ट 1942 रोजी तुमसरला माकडे गुरूजी, भिवाजी लांजेवार तर भंडारा येथे सखारामजी परसोडकर या प्रमुख पुढाऱ्यांना अटक केली. 10 ऑगस्टलाच रात्री बाबुजी लांजेवार यांच्या अन्नपुर्णा राईसमिल मध्ये एक गुप्त बैठक घेण्यात आली, या बैठकित 80 लोकांनी भाग घेतला. बैठक रात्री 2 वाजे पर्यंत चालली, या बैठकीत तत्कालीन परिस्थितीवर विचारविनिमय करून, आपल्या रक्ताने हस्ताक्षर करून प्रतिज्ञा घेतली की, कुठल्याही परिस्थितीत जिवाची पर्वा न करता, स्वातंत्र्यलढा तिव्र करून, मुख्य कचेरीवरराष्ट्रीय ध्वज लावण्याचा निर्णय घेण्यात आला. पोलीसांना राष्ट्रीय ध्वज लावण्याची माहीती मिळताच, भंडाऱ्याहून जादा कुमक मागविली. तुमसरमध्ये रोज मिरवणुका काढून ब्रिटीश विरोधी घोषणा दिल्या जात होत्या. स्वातंत्र्यलढयाला गती येण्याकरीता योजना आखून, विचारविमर्श करण्यात येत होता. भंडाऱ्याचे स्पेशल मॅजिस्ट्रेट जयवंत 13 ऑगस्टला तुमसरला आले, 14 ऑगस्टचा दिवस उजाडताच तुमसरमध्ये धरपकडीला सुरूवात, करून बुधराम देशमुख, नत्थुजी चौधरी, किसनराव माणकर, तानबाजी नाईक यांना अटक केली. इतकेच नव्हे तर पोलीसांनी अनेक घरांची झडती घेतली, तर काही प्रमाणात लुटमार सुध्दा केली. पोलीसांच्या दडपशाहीमुळे तुमसर मधील वातावरण प्रक्षुब्ध झाले होते. तुमसरमध्ये अशा तणावपुर्ण वातावरणात मिरवणूक काढण्यासाठी प्रत्येक मोहल्यातुन लोक गोळा होवून, एक भव्य मिरवणुक, घोषणा देत पोलीस स्टेशनच्या दिशेने निघाली. सकाळचे 11 वाजले होते, मिरवणुकीतील लोक संतप्त होवून ब्रिटीश विरूध्द घोषणा देत होते. ‘वंदे मातरम’, ‘भारत माता की जय’, पोलीस स्टेशन रिकामे करा, अशा घोषणांमुळे वातावरण प्रक्षुब्ध बनले होते. पोलीसांनी लोकांमधील उत्साह पाहून सुरवातीला लाठीमार केला. त्यास प्रत्युत्तर म्हणुन लोकांनी पोलीसांवर दगडफेक सुरू केली, लाठीमाराला न जुमानता लोक पोलीस स्टेशनच्या दिशेने, राष्ट्रीय ध्वज लावण्यास जावु लागताच, ठाणेदाराच्या ख्रिश्चन पत्नीने पिस्तुलाच्या सहाय्याने लोकांना धमकाविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा काहीही परिणाम होत नाही. हे बघताच एक गोळी चालविली, ती

गोळी श्रीराम धुर्वे या अल्पवयीन मुलाच्या डोक्याला लागुन तो जागीच शहीद झाला, तुमसरच्या स्वातंत्र्यलढयात अशाप्रकारे ठाणेदाराच्या पत्नीचे चालविलेल्या गोळीने तुमसरसह भंडारा जिल्हयात पहिला शहीद झाला. कदाचित संपुर्ण भारतातील ही एकमेव घटना असावी की, स्त्रीने गोळीबार केला. श्रीराम धुर्वे हा अल्पवयीन मुलगा शहीद होताच लोक चिडले व त्यांनी पोलीसांवर तुफान दगडफेक सुरू केली. तेंव्हा पोलीसांनी गोळीबाराला सुरूवात केली. पोलीस गोळीबार समाधानकारक करीत नाही, असे वाटुन, भंडाऱ्याचे स्पेशल मॅजिस्ट्रेट जयवंत यांनी स्वतःच गोळया निशस्त्र तुमसरवासियांवर झाडल्या.पोलीसांच्या गोळया लागुन 6 जणशहीद झाले, तर 130 जण जखमी झाले, जखमींना दवाखान्यात नेण्यात आले. 1942 च्या स्वातंत्र्यलढयातील ही रक्तरंजीत घटना भंडारा जिल्हयातील पहीलीच घटना होय.

**14 ऑगस्ट 1942 रोजी तुमसरलढयातीलशहीद :**

**1) श्रीराम रामाजी धुर्वे 2) भदुजी रामाजी लोंदासे 3) श्रीहरी काशीनाथ फाये**
**4) पांडुरंग परसराम सोनवाल 5) भुवाजी बालाजी वानोरे 6) राजाराम पैकु धुर्वे**

पोलीसांनी केलेल्या गोळीबारात 6 लोक शहीद तर 130 जखमी होताच जमाव पांगला. परंतु 6 शहीदांचे मृतदेह एकत्रित करण्यासाठी तुमसरवासी पुन्हा गोळा झाले. पोलीस बंदोबस्त असुनही सदाशिव किटे, नत्थु पहलवान यांनी पुढाकार घेतला. सर्वत्र पडलेला रक्ताचा सडा पाहुन दामले गुरूजी, एस.डी.ओ. जयवंत यांना गर्जना करून ठणकाविले की, आपण इंग्रज सत्तेचे नोकर, परंतु देशभक्तांशी असा अमानूष व्यवहार? व छाती पुढे करत, माझ्यावर गोळी चालवा असे आव्हान केले, उपस्थित नागरीकांनी मृतदेह पोलीस स्टेशन सामोरून गोळा केले व घेऊन गेले.

14 ऑगस्टला तुमसरला शहीदांची प्रेतयात्रा निघुनये, म्हणुन भंडाऱ्यावरून अधिक कुमक येणार होती. ही बातमी भंडारातालुका कॉग्रेसचे अध्यक्ष बिहारीलाल शाहु यांना कळताच त्यांनी लगेच मोहाडीला जावून सखारामजी रोकडे यांना सांगितले की, लष्करी तुकडी कसेही करून मोहाडीत थोपहुन ठेवा. सखारामजी रोकडे यांनी नामदेव मोटघरे व महादेव महालगावे यांना लोकांना गोळा करण्यास सांगीतले.लवकरच गांधी चौकात मोठया प्रमाणात लोक गोळा झाले. सखारामजी रोकडे यांनी लोकांना परिस्थितीची जाणीव करून देवून,लष्करी तुकडीकोणत्याही परिस्थितीत तुमसरला पोहचता कामा नये, असे आवाहन केले. मोहाडीवासियांनी सखारामजी रोकडे यांच्या नेतृत्वाखाली मोहाडी भंडारा मार्गावर ठिकठिकाणी दगड, विटा, मोठी लाकडे,झाडांच्या मोठमोठया फांदया आडव्या टाकून व मार्गातील दोन्ही पुलांच्या बाजुचे मुनारे तोडुन ते आडवे ठवले. तसेच दोन्ही नाल्याचे रफटे तोडफोड करून मोटार रहदारीचा मार्ग अजिबात बंद केला. भंडारा येथून लष्करी शिपायाची लॉरी निघाली, परंतु बोथली जवळील नाल्यातुन पुढे जाऊ शकली नाही. मेठया प्रमाणात प्रयत्न करूनही लष्कराला पुढे जाण्यात यश न मिळाल्यामुळे लॉरी परत भंडाऱ्याला गेली. मोहाडीवासियांच्या प्रयत्नाला यश येवुन लष्करी तुकडी तुमसरला पोहचूशकली नाही. तुमसरला आवेशपुर्ण दुःखमय वातावरणात सायंकाळी शहीदांची पेतयात्रा निघाली त्यावेळी 10 हजार पुरूष व प्रथमच अंतयात्रेत 250 महीला सहभागी झाल्या होत्या. सर्व सहाही शहीदांना नाल्याजवळील स्मशानभुमीत एकत्र अग्नि देण्यात आली. त्यावेळी 'भारत माता की जय' या घोषणांनी वातावरण दुमदुमुन गेले. पोलीसांच्या गोळीबाराने तुमसरवासीयांच्या मनात काही काळ भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

***तुमसरमध्ये धरपकड :***

15 ऑगस्टला तुमसरमध्ये 144 कलम लागु करून, राष्ट्रीय विद्यालय बंद करण्यात आले. तुमसरमध्ये दहशत निर्माण व्हावी म्हणून ठिकठिकाणी पोलीसांनी धाडी घालुन दामले गुरूजी, नारायणराव कारेमोरे,सदाशीव कोडेवार, नारबाजी पाटील, वा. गो. कुलकर्णी इ. लोकांना अटक केली. त्याचप्रमाणे भो.म. लांजेवार यांच्या घरी बुलेटिन्स व पत्रे सापडल्यामुळे पोलीसांनी त्यांनाही अटक केली. सर्वांना भंडारा व जबलपुर कारागृहात पाठविण्यात आले. दुसऱ्या दिवशी म्हणजे 15 ऑगस्टला लष्करी तुकडीचे तुमसरमध्ये आगमन झाले. लष्कराने लोकांच्या मनात भिती निर्माण व्हावी म्हणून गावात गस्त घालायला सुरवात केली. त्यामुळे काही काळ तुमसरमध्ये स्वातंत्र्याची चळवळ थंडावल्यासारखी दिसत असली, तरी जनतेच्या मनात स्वातंत्र्याची भावना खदखदत होती.

***मिरवणूकीला पुन्हा सुरवात :***

तुमसरमध्ये 144 कलमाचा भंग करून, गोविंदा मेश्राम, नामदेव साबळे, मंगरू रवाती, श्यामराव माल्लेवार, तुकाराम लोहकरे, नत्थु बांगडकर इ. नी पुढाकार घेवून हनुमान वार्डातून मिरवणूक काढली. गोविंद मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली मिरवणूक पोलीस स्टेशनकडे जात असतांनाच, पोलीसांची गाडी येताच, मिरवणूकीतील लोकांनी गगनभेदी घोषणा दिल्या. पोलीसांनी गाडीतून उतरून हातातील झेंडयाची काठी घेवून, कपडयाचा झेंडा परत केला व धमकी देवून निघून गेले. यानंतर गोविंद मेश्राम आपल्या नामदेव व मंगरू सहकाऱ्यासह 'भारत माता की जय' म्हणत येतांना भिवाजी लांजेवार यांच्या घराजवळ पांडुरंग कुंभलकर मित्र भेटताच, घडलेल्या घटनेबद्दल माहीती देत असतांनाच, अचानक तेथे पोलीस व्हॅन आली. पोलीसांनी पुन्हा धमकी देवून गोविंद मेश्राम व नामदेव सावळे यांना सोडून दिले. रोज तुमसरमध्ये राष्ट्रीय ध्वजाची मिरवणूक निघणे चालूच

होते. बुलेटिन्स वाटपाचे कामही जोरात सुरु होते. पोलीसांनी ठिकठिकाणी धाडी घालून मोठया प्रमाणात कार्यकर्त्यांना अटक केली.

***ग्रामीण भागात चळवळीचा प्रसार :***

गोविंदा मेश्राम, हेमराज साखरवाडे, नामदेव पाबळे यांनी पायदळ प्रवास करून 'चलेजाव' चळवळीचा प्रसार ग्रामीण भागात मौखीक व पत्रकाद्वारे मोठया प्रमाणात केला. भंडारा तालुक्यातील डोंगरला, खैरलांजी, मोहगांव, खदान, सिओरा, चुल्हाड, चांदपुर, सिलेगांव, दांडेगांव, येकोळी इ. भागात प्रवास करून, चळवळीचा प्रसार केला आणि ते गोंदीयाला पोहचले. ब्रिटीशांच्या दहशतीमुळेलोक त्यांना मदत करायला भित होते, परंतु बाबा जागळेकर यांनी अत्यंत कठीण काळात गोविंदा मेश्राम व त्यांच्या सहकाऱ्याला मदत केली, परंतु पोलीसांना गोविंद व त्याच्या सहकाऱ्याची माहीती मिळताच, त्यांनी पाठलाग सुरू केल्याने, गोविंदा व त्याच्या सहकाऱ्यांना गोंदीया सोडावे लागले. मात्र हेमराजला अटक करण्यात पोलीसांना यश आले. पोलीसांनी गोविंदा मेश्राम व नामदेव साबळे यांच्या नावाने पकड वारंट जारी केला. शेवटी 16–17 दिवसांनी गोविंदा व नामदेवला पोलीसांना अटक करण्यात यश आले. अटक करण्यात उशिर झाल्यामुळे, गोविंदा व नामदेवला हातकडया घालून त्यांची रवाणगी भंडारा कारागृहात केली. त्यांना 10 आक्टोबर 1942 रोजी 6 महीन्याची शिक्षा सुनावण्यात आली.तुमसरमध्ये काही प्रमाणात 'चलेजाव' चळवळ सुरूच होती. प्रल्हाद गजभियेला मिन्शीजवळ पत्रक वाटपाच्या आरोपाखाली 24 मार्च 1942 रोजी अटक करण्यात आली. ही तुमसरमधील शेवटची अटक होती. तरीही काही प्रमाणात चलेजाव चळवळ तुमसर मध्ये सुरूच होती.

***निष्कर्ष :***

महाराष्ट्रातील अतिपूर्वेकडील भंडारा जिल्हाही स्वातंत्र्यलढयात मागे नव्हता. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांनी भंडारा जिल्हयाचा दौरा करून केलेल्या, जागृतीमुळे मोठयाप्रमाणात स्वातंत्र्य आंदोलनाच्या सर्वच चळवळीत तुमसरसह, भंडारा जिल्हयातील सर्व जाती, धर्म, पंथाच्या लोकांनी भाग घेतला होता. 1942 च्या आंदोलनाची तिव्रता तर तुमसरमध्ये मोठयाप्रमाणात होती. 9 ऑगस्टला भारतभर 'चलेजाव' चळवळीला सुरूवात होताच, खबरदारी म्हणून 10 ऑगस्टला तुमसरमधील प्रमुख पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. परंतु त्याचा काही परिणाम चळवळीवर झाला नाही. 10 ऑगस्टला रात्री बाबुजी लांजेवार यांच्या राईस मिल मध्ये गुप्त बैठक होवून, आपल्या रक्ताने हस्ताक्षर करून, बैठकीतील प्रतिनिधींनी शपथ घेतली की, कुठल्याही परिस्थितीत जिवाची पर्वा न करता, स्वातंत्र्यलढा तिव्र करून, मुख्य कचेरीवर राष्ट्रीय ध्वज लावण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय ध्वज लावण्यासाठी तुमसरवासी जात असतांना, ठाणेदाराच्या ख्रिश्चन पत्नीने पिस्तुलाच्या सहाय्याने धमकाविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा काहीही परिणाम होत नाही, हे बघताच एक गोळी चालविली, ती गोळी श्रीराम धुर्वे या अल्पवयीन मुलाच्या डोक्याला लागून तो शहीद झाला. ठाणेदाराच्या पत्नीने केलेल्या गोळीबाराने शहीद होण्याची ही घटना, कदाचीत भारतातील पहिलीच घटना असेल. श्रीराम धुर्वे शहीद होताच लोकांनी तुफान गोटयांचा मारा केला असता, पोलीसांनी व एस.डी.ओ. जयवंत यांनी केलेल्या गोळीबारात पाच लोक शहीद झाले. व 130 लोक जखमी झाले. पोलीसांच्या गोळीबाराने सहा जण शहीद होताच काही काळ 'चलेजाव' चळवळ मंदावली. तुमसरमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी 144 कलमाखाली कित्येकांना अटक करण्यात आली. पण त्याचा काही परिणाम झाला नाही तुमसर वासीयांनी 144 कलमांचा भंग करून, मिरवणूका काढून ब्रिटीश विरोधी घोषणा दिल्या ग्रामीण भागातही गोविंद मेश्राम व त्याच्या सहकार्यांनी 'चलेजाव' चळवळीचा प्रसार केला. पण शेवटी त्यांनाही अटक करण्यात ब्रिटीशांना यश आले. गोविंदा मेश्राम व नामदेव साबळे यांना 6 महिन्याची शिक्षा झाली.

***संदर्भ ग्रंथ :***

1) रोकडे सखाराम ना. मोहाडी कॉग्रेस कार्य स्मरणिका दा.मा. पातरे 1986
2) हंडियेकर डॉ. वि.ना. स्वातंत्र्यलढयातील भंडारा जिल्हा ऑ.क्रा.सु.म. समिती 1992
3) मेश्राम गोविंदा गणपत यांच्याजवळील अप्रकाषीत माहीतीतुन (स्वातंत्र्य सैनिक तुमसर)
4) रामचंद्र लांजेवार, सखाराम रोकडे या स्वातंत्र्य सैनिकांच्या 13 नोव्हेंबर 2002 च्या मुलाखतीतुन